# जाहीर सूचना

महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्र.सिआयडी-३३१८/प्र.क्र.२१०/नवि-१०,दि.०३ ऑक्टोबर, २०१८ अन्वये मौजे ओवे ता. पनवेल जि.रायगड येथील सिडको अधिसुचित क्षेत्रातील कोयना प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या मौजे ओवे येथील सर्व्हे.क्र. १८३ मधील जमिनींच्या व्यवहाराचे तसेच गत १५ वर्षामध्ये या स्वरुपाचे व्यवहार झालेल्या कोयना प्रकल्पग्रस्तांना जमिन वाटप करण्यात आलेल्या अन्य प्रकरणांची चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय चौकशी समिती स्थापन झालेली आहे. या ओवे कोयना प्रकल्पग्रस्त चौकशी समितीचे कार्यालय मा.अध्यक्ष, नवी मुंबई आं. विमानतळ अभियांत्रिकी विभाग (सिडको) ३ रा मजला. टॉवर क्र.१०, सी.बी.डी बेलापूर स्टेशन कॉम्प्लेक्स, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४ येथे सुरु झालेले आहे. ह्या सुचनेद्वारे सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की गेल्या १५ वर्षांचे कालावधीत कोयना प्रकल्पग्रस्तांना झालेल्या जमिनीचे वाटप, हस्तांतरण, नोंदणी किंवा विकास यासंबंधी कोणाही व्यक्ती, कंपनी, फर्म किंवा लोकसेवक, शासकीय कर्मचारी किंवा अधिकारी यांना समितीला कोणत्याही प्रकारची माहिती द्यावयाची असेल किंवा आक्षेप नोंदवायचा असेल तर तसे फक्त खाली दर्शविलेल्या पध्दतीनेच करावे.

१. माहिती किंवा आक्षेप फक्त प्रतिज्ञापत्र / शपथपत्रावरच दाखल करणे आवश्यक आहे.

२. माहिती किंवा आक्षेप नोंदविणाऱ्या व्यक्तीने आपली ओळख पटावी व पत्त्याचा पुरावा मिळावा असे आधार कार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, ड्रायव्हींग लायसन्स, शासकीय ओळखपत्र पैकी कशाचीही फोटो प्रत सोबत जोडावी. आपला संपुर्ण पत्ता, ई-मेल, भ्रमणध्वनी, दुरध्वनी क्रमांक देणे आवश्यक आहे.

३. माहिती किंवा आक्षेपाच्या पुष्ठ्यर्थ काही कागदपत्रे जोडावयाची असल्यास त्याची सत्यता स्वत:चे स्वाक्षरीने साक्षांकीत करावी.

४. खोटी किंवा चुकीची माहिती पुरविल्यास भारतीय दंड संहितेच्या कलमांखाली कारवाई आणि शिक्षा होऊ शकते ह्याची जाणीव असावी.

५. समितीस प्राप्त झालेली माहिती प्रसिध्द केली जाणार नाही. तथापी संपुर्ण माहिती चौकशीच्या अंती अहवालासोबत शासनाला सुपुर्द केली जाणार असल्याने ती माहिती गोपनीय राहण्याची हमी समिती देऊ शकत नाही. समिती न्यायालय नाही ह्याची नोंद घ्यावी आणि त्यामुळे समितीला दिलेल्या माहिती संबंधी दिवाणी /फौजदारी न्यायालयीन कारवाई होऊ शकते याची नोंद घ्यावी.

६. वरील विषयांकित माहिती/ प्रातिनिधिक अर्ज स्पीड पोस्ट किंवा नोंदणीकृत डाकेने (पोचसहित) वरील चौकशी समितीच्या कार्यालयामध्ये दि.३० जानेवारी, २०१९, बुधवार, दुपारी - ३:०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोचेल अशा पध्दतीने पाठविणे आवश्यक आहे. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज / माहिती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. जर चौकशी समितीस अर्जदार व्यक्ती / संस्था/ कंपनी यांच्याकडून त्यांचे अर्ज विषयी अधिकची माहिती आवश्यक झाल्यास त्याची पुर्तता पत्र मिळल्यापासुन ७ दिवसामध्ये करणे आवश्यक राहिल. अपूर्ण किंवा असंबंध माहिती विचारात घेतली जाणार नाही.

**अध्यक्षा करिता**
**मौजे ओवे-कोयना प्रकल्पग्रस्त**
**जमीन वाटप चौकशी समिती**

Scanned by CamScanner